


# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026




* वर्ष ६५ वे * अंक २० * नांदेड * बुधवार, दि. २१ जानेवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष, चिन्हांबाबत आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष आणि चिन्हाची सुनावणी आज (२१ जानेवारी) सर्वोच्च न्यायालयात होणार आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या फुटीनंतर पक्ष आणि चिन्हाचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचला आहे. गेल्या तीन वर्षांपासून सर्वोच्च न्यायालयात याबाबत सुनावणी सुरु आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष हा एकनाथ शिंदे यांचा तर राष्ट्रवादी हा अजित पवारांचा पक्ष असल्याचा निर्णय दिला. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि शरद पवारांच्या गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

राज्यात नुकत्याच नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिकांच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीत एकनाथ शिंदेंनी शिवसेना आणि धनुष्यबाणाच्या चिन्हावर निवडणुका लढवल्या. तर उद्धव ठाकरेंनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि मशाल चिन्हावर निवडणुका लढवल्या. मात्र आता पुढील सुनावणीत शिवसेना नाव आणि चिन्ह उद्धव ठाकरेंना मिळाल्यास विविध प्रश्न उपस्थित राहतील. या सगळ्या प्रकरणावर ॲड असिम सरोदे यांनी एक्सवर ट्विट केलं आहे.

शिवसेना नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह.. सुनावणीची तारीख आज सुप्रीम कोर्टात आहे. पण ३७ नंबरचे मॅटर सुनावणीसाठी रिच होणे कठीण आहे. आता लोकांचा नवीन प्रश्न– जर एकनाथ शिंदेंकडून पक्ष चिन्ह व शिवसेना नाव काढून घेतले तर मुंबई महापालिकेत काय होईल? मला वाटते शिंदेसेना भाजपमध्ये विलीन होईल व एकनाथ शिंदे यांचे राजकीय महत्व एकदम कमी होईल. शिंदेसेनेतील अनेकजण उद्धव ठाकरेंकडे स्वगृही परत जातील व मूळ शिवसेना अधिक ताकदवान होईल. उद्धव आणि राज ठाकरे मिळून मुंबई महापालिकेतील राजकारण फिरवू शकतील. सर्वोच्च न्यायालयातील एका निर्णयामुळे सुरु झालेला खेळ सर्वोच्च न्यायालयाच कधीतरी संपवेल, असं असिम सरोदे यांनी म्हटलं आहे.

शिवसेना पक्ष आणि या पक्षाचं निवडणूक चिन्ह असलेला धनुष्यबाण कोणाचा, या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. २०२२ साली एकसंध शिवसेनेतून फुटलेल्या एकनाथ यांचा पक्ष हाच खरा शिवसेना पक्ष असल्याच्या आणि त्यांना धनुष्यबाण हे चिन्ह वापरण्यास मुभा देणाऱ्या केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयाला उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्यामुळे आज होणाऱ्या सुनावणीकडे अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.

## मोकाट कुत्र्यांचा हल्ला; मुरादाबादमध्ये चार वर्षांच्या मुलीचा मृत्यू

**मुरादाबाद (प्रतिनिधी)–** उत्तर प्रदेशातील मुरादाबादमध्ये मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्याने एक हृदयद्रावक घटना घडली आहे. चार वर्षांच्या चिमुकलीचा भटक्या कुत्र्यांच्या टोळीने जीव घेतल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. त्यामुळे लहान मुलांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

नुसरत नावाची चार वर्षांची मुलगी घराजवळ इतर मुलांसोबत खेळत होती. त्याचवेळी काही मोकाट कुत्र्यांनी तिच्यावर अचानक हल्ला केला. सोबतची मुले घाबरून पळून गेली, मात्र नुसरत त्या कुत्र्यांच्या तावडीत सापडली. कुत्र्यांनी तिला ओढत जवळच्या तलावाच्या दिशेने नेले. तलावाजवळ कुत्र्यांनी तिच्यावर वारंवार चावे घेतले. गंभीर जखमा झाल्याने आणि वेदना सहन न झाल्याने चिमुकलीने जागीच प्राण सोडले.

बराच वेळ झाला तरी मुलगी घरी न आल्याने कुटुंबियांनी शोध सुरू केला. शोध घेत असताना नुसरतचे वडील तलावाजवळ पोहोचले असता त्यांना मुलीचा रक्ताने माखलेला मृतदेह आढळून आला. तातडीने तिला रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शहरात वाढत चाललेल्या मोकाट कुत्र्यांच्या समस्येकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहावे, अशी मागणी होत आहे. लहान मुलांसह नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## शक्य तिथे घड्याळ, शक्य तिथे तुतारी; झेडपीसाठी दोन्ही राष्ट्रवादीतील निर्णय अंतिम टप्प्यात

**पुणे (प्रतिनिधी)–** जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस या पक्ष चिन्हांचा सोयीनुसार वापर करण्यात येणार आहे. जिथे जे चिन्ह फायद्याचं ठरेल तिथे ते चिन्ह वापरून उमेदवार उभे केले जाणार आहेत. महापालिका निवडणुकांनंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी एकत्र बैठक करुन ही स्ट्रॅटेजी ठरवली आहे. पुणे जिल्ह्यात आणि राज्यातील इतर जिल्ह्यांमधे देखील घड्याळ आणि तुतारी वाजविणारा माणूस अशा दोन्ही चिन्हांवर राष्ट्रवादीचे उमेदवार निवडणूक लढणार आहेत.

एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसमधील चिन्हाची लढाई सर्वोच्च न्यायालयात निर्णायक टप्प्यावर पोहोचलेली असताना दुसरीकडे दोन पक्षांमधील अंडरस्टँडिंग देखील निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याचं चित्र आहे. त्यामुळं न्यायलयाचा निकाल कुणाच्याही बाजूने लागो, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसनी महापालिकेप्रमाणे जिल्हा परिषदांच्या निवडणुका देखील एकोप्याने लढवण्याचा निर्णय घेतलाय.

जिथे जे चिन्ह फायद्याचं ठरेल तिथं ते चिन्ह वापरण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार घड्याळ या एकाच चिन्हावर लढणार आहेत आणि या उमेदवारांची जबाबदारी तुतारीच्या चिन्हावर खासदार म्हणून निवडून आलेल्या डॉ. अमोल कोल्हेंवर असणार आहे. जुन्नर तालुक्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनचं आव्हान असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

शेजारच्या आंबेगाव तालुक्यात घड्याळ आणि तुतारीचे उमेदवार एकमेकांच्या विरोधात लढणार आहेत. दिलीप वळसे पाटील यांच्या विरोधात तुतारीकडून निवडणूक लढवणाऱ्या देवदत्त निकमांमध्ये समेट होऊ न शकल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे दोघांपैकी कोणाचीही सरशी झाली तरी फायदा राष्ट्रवादीचाच होणार आहे.

महापालिका निवडणुकीवेळी देखील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी समन्व्य राखत उमेदवार दिले होते. पुणे महापालिकेचा जो भाग सुप्रिया सुळेंच्या बारामती लोकसभा मतदारसंघात येतो आणि जो भाग अमोल कोल्हेंच्या शिरूर लोकसभा मतदारसंघात येतो त्या भांगामध्ये तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हांवर उमेदवार उभे करून त्यांना निवडणून आणण्यात आले. एका अर्थाने तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाचे अस्तित्व कायम राहील याची खबरदारी घेण्यात आली.

## युती तोडा, संभाजीनगरमध्ये भाजप कार्यकर्त्यांचा पालकमंत्री सावे यांच्यासमोर राडा

**संभाजीनगर (प्रतिनिधी)–** राज्यातील महापालिका निवडणुकानंतर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी युती आणि आघाड्यांची बोलणी सुरू आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये जिल्हा परिषद निवडणुकांसाठी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेची अखेर युती झाली आहे. शिवसेना २५ तर भाजप २७ जागा लढवणार असल्याची घोषणा शिवसेनेकडून पालकमंत्री संजय शिरसाट तर भाजपकडून बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी घोषणा केली. मात्र, युतीच्या घोषणेनंतर संभाजीनगरमध्ये चांगलाच राडा झाल्याचं पाहायला मिळालं. भाजप कार्यकर्त्यांनी मंत्री अतुल सावे यांच्यासमोर हात जोडले, तसेच त्यांच्या गाड्याही अडवल्या. साहेब, युती तोडा असे म्हणत भाजपा कार्यकर्त्यांनी झेडपी निवडणुकांच्या युतीला थेट विरोध दर्शवला आहे.

संभाजीनगरमधील शिवसेना–भाजपची ही युती जिल्ह्यातील केवळ सात तालुक्यात असणार आहे. मात्र, सोयगाव आणि सिल्लोड या दोन तालुक्यातील ११ ठिकाणी युती न करता शिवसेना आणि भाजप हे एकमेकांच्या विरोधात निवडणूक लढवणार आहेत. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये इच्छुकांचा जसा राडा झाला होता तसाच राडा आज जिल्हा परिषद निवडणुकीच्या युतीच्या घोषणेनंतर त्याच ठिकाणी झाला. वैजापूर तालुक्यातील भाजपचे भाजपचे काही पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे थेट मंत्री अतुल सावे आणि भाजपचे आमदार खासदार यांना घेराव घालण्याचा प्रयत्न केला.

## एकत्र लढलेल्या महापालिकांमध्ये महायुतीचाच महापौर –उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई (प्रतिनिधी)–** महापालिकांमध्ये एकत्र लढलो तिथे युतीचाच महापौर होईल. शिवसेना आणि भाजप मुंबई महानगरपालिकेत महायुती एकत्र निवडणूक लढलो असून इथेही महायुतीचा महापौर होईल असा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला.

राज्यातील महापालिकांच्या महापौरपदाची सोडत येत्या गुरूवारी निघणार असल्याच्या पार्श्वभूमीवर विविध महापालिकांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार आघाडी, युती यांच्या सत्तासमीकरणाची मोर्चेबांधणी सुरु झाली आहे. शिवसेना आणि भाजप अनेक महापालिकांमध्ये युती म्हणून लढले असते तरी महापालिकेत आपल्याच पक्षाचा महापौर बसावा यासाठी दोन्ही पक्षांनी डापवपेच आखायला सुरुवात केली आहे. त्यातच मुंबईचे महापौरपद शिंदे यांनी प्रतिष्ठेचे केल्याचे बोलले जात आहे. मुंबई महापालिकेत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नसल्याने, आणि शिवसेनेने आपले नगरसेवक पंचतारांकित हॉटेलमध्ये ठेवल्याने याबाबत अनेक तर्क वितर्क लावण्यात येत असले तरी शिंदे यांनी मात्र मुंबई महापालिकेत युतीचाच महापौर बसेल याचा पुनरुच्चार करीत शंकाकुशंकांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला.

## बंगळूरुत स्थानिक निवडणुका बॅलेट पेपरवर

**बंगळूर (प्रतिनिधी)–** कर्नाटक राज्य निवडणूक आयोगाने २५ मे नंतर होणाऱ्या बंगळूरु येथील स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनऐवजी बॅलेट पेपर वापरण्याचा निर्णय घेतला आहे.



ग्रेटर बंगळूरु एरिया स्थानिक संस्थेच्या निवडणुकीत बॅलेट पेपरवर मतदान पार पडणार आहे. कर्नाटकचे मुख्य निवडणूक अधिकारी जी. एस संगरेशी यांनी ही घोषणा केली. येत्या मे–जून महिन्यात याठिकाणी निवडणूक लागणार आहे. जिल्हा पंचायत–पंचायत समिती निवडणूकही बॅलेट पेपरवर मुख्य निवडणूक अधिकारी जी. एस संगरेशी यांनी म्हटलं की, या वर्षीच्या अखेरीस होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकाही बॅलेट पेपरने घेतल्या जातील. १० वी, १२ वीच्या परीक्षा संपल्यानंतर २५ मे झाल्यावर स्थानिक निवडणुका घोषित केल्या जातील. यावेळी ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरचा वापर केला जाईल असं त्यांनी सांगितले. निवडणूक आयोगाने ईव्हीएम न वापरता बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याचं कारण स्पष्ट केले नाही. बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्यास कायद्यात कुठेही अडचण नाही. त्यामुळे या निवडणुकीत बॅलेटचा वापर केला जाईल इतकेच निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनसोबत छेडछाड होत असल्याचा आरोप सातत्याने काँग्रेससह प्रमुख विरोधी पक्ष करतात. त्यामुळे काँग्रेस शासित राज्यात अशाप्रकारे बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याचा संदर्भ ईव्हीएमवरील आरोपांशी जोडला जातो. तर बॅलेटच्या वापरावर बंदी नाही. अमेरिकेसारख्या विकसित देशातही बॅलेट पेपरवर निवडणूक घेतली जाते.

## पुण्यात ग्रँड सायकल टूरदरम्यान अपघात; ५० पेक्षा जास्त सायकलस्वार एकमेकांवर आदळले

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यात आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा 'पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६' पार पडली. या स्पर्धेत रस्ता अरुंद असल्याने रस्त्याचा सायकलस्वारांना अंदाज न आल्याने टूरदरम्यान अपघात झाला. या अपघातात ५० पेक्षा जास्त सायकलस्वार जखमी झाले आहेत. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

पुणे ग्रँड सायकल टूरमधील काही सायकलस्वार एकापाठोपाठ एक असे एकमेकांवर आदळल्यांचं व्हायरल व्हिडीओत दिसत आहे. ही घटना घडल्यानंतर काही सायकलस्वार ट्रॅक सोडून बाजूला फेकले गेल्याचं दिसत आहे. या घटनेत काही सायकलस्वार जखमी झाले आहेत. ही घटना घडल्यानंतर पोलिसांनी तातडीने धाव घेत त्यांना मदत केली. या घटनेत काही सायकलस्वारांना दुखापत झाली. या सायकलस्वारांकडे असलेल्या काही महागड्या सायकलींचं देखील या घटनेत मोठं नुकसान झाल्याचं सांगितलं जात आहे.

## हिंद–दी–चादर शहीदी समागम कार्यक्रमात सेवाभावी संस्था व नागरिकांनी सहभाग घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

### सेवा स्टॉलच्या माध्यमातून सेवेची सुवर्णसंधी –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी हिंद–दी–चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त भव्य विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी देश–विदेशातून तसेच राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर भाविक नांदेड येथे उपस्थित राहणार आहेत.

या पार्श्वभूमीवर, कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांच्या सेवेसाठी शहरातील विविध ठिकाणी सेवा स्टॉल्सची उभारणी करण्यात येत आहे. या सेवा स्टॉल्सवर भाविकांसाठी चहा, पाणी, नाश्ता, फलाहार आदी सुविधा निःशुल्क स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या सेवाकार्यासाठी विविध सेवाभावी संस्था, व्यापारी व व्यावसायिक आस्थापना, उद्योजक, शासकीय कार्यालये, बँकिंग क्षेत्र तसेच सेवा देण्याची इच्छा असलेल्या नागरिकांनी नोंदणी केली आहे. अधिकाधिक भाविकांना उत्तम सेवा देता यावी यासाठी आणखी जास्तीत जास्त संस्था व नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

सेवा हीच खरी श्रद्धांजली असून, सेवा स्टॉलच्या माध्यमातून समाजसेवेची संधी सर्वांनी साधावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी नमूद केले.

सेवा स्टॉल्सच्या नोंदणीसाठी इच्छुकांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे तहसीलदार (महसूल) यांचेशी संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

## पाकिस्तानसह ७५ देशांच्या नागरिकांसाठी अमेरिकेची दार बंद

**न्यूयॉर्क (वृत्तसंस्था)–** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आक्रमक धोरण राबवण्यास सुरुवात केली आहे. व्हेनेझुएलावर ताबा मिळवल्यानंत डोनाल्ड ट्रम्प यांनी इराण विरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या नेतृत्त्वात अमेरिकेनं ७५ देशांमधून व्हिसासाठी येणारे अर्ज नामंजूर करण्याचे आदेश दिले आहेत.

अमेरिकेतील सार्वजनिक सेवांवर अवलंबून असणाऱ्या व्हिसा धारकांवर नजर ठेवणं हा उद्देश व्हिसा रद्द करण्यामागं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी ज्या ७५ देशांच्या नागरिकांना व्हिसा नाकारण्यास सांगितलं आहे त्यात इराण, रशिया, अफगाणिस्तान, इराक, नायजेरिया आणि ब्राझील सारख्या देशांचा समावेश आहे. हे निर्बंध २१ जानेवारीपासून लागू होणार असून ते अनिश्चित काळासाठी लागू असणार आहेत. फॉक्स न्यूजच्या अनुसार, अमेरिकन दूतावासांना सध्याच्या कायद्यानुसार व्हिसा देण्यास नकार देण्यास सांगण्यात आलं आहे.




## गोविंद पानसरे हत्याप्रकरणातील आरोपी समीर गायकवाडचा हृदयविकाराने मृत्यू

**मुंबई (प्रतिनिधी)–** कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपी समीर गायकवाड याचा मंगळवारी सकाळी हृदयविकाराने मृत्यू झाला. सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पहाटेच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, समीर गायकवाड याला काल मध्यरात्री अचानक अस्वस्थ वाटू लागले. त्यानंतर त्याला तातडीने सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच आज सकाळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. मृत्यूचे कारण हृदयविकार असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी स्पष्ट केले आहे. समीर गायकवाड हा गेल्या चार वर्षांपासून पानसरे हत्या प्रकरणात जामिनावर बाहेर होता. जामीन मिळाल्यानंतर तो सांगलीतील विकास चौक परिसरात आपल्या कुटुंबासह वास्तव्यास होता. समीर गायकवाडच्या मृत्यूची बातमी त्याच्या घरी धडकताच कुटुंबावर शोककळा पसरली.

## प्रवाशांच्या अतिरिक्त गर्दीच्या निवारणासाठी चंदीगड, हजरत निजामुद्दीन, अमृतसर येथून नांदेडकरिता विशेष गाड्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रवाशांच्या वाढत्या मागणीचा विचार करून उत्तर रेल्वेकडून चंदीगड–नांदेड–चंदीगड आणि हजरत निजामुद्दीन–नांदेड–हजरत निजामुद्दीन अमृतसर – चेरलापल्ली– अमृतसर या मार्गावर विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. या विशेष गाड्या प्रवाशांच्या सोयीसाठी दिलेल्या दिनांकांना धावणार आहेत.

गाडी क्र. ०४६४२ अमृतसर चेरलापल्ली विशेष गाडी : ही गाडी अमृतसर येथून दि. २३ जानेवारी आणि २४ जानेवारी रोजी सकाळी ३.३५ वाजता सुटेल आणि जालंधर, फगवारा, अंबाला, पानिपत, दिल्ली, आगरा, झांसी, बिना, भोपाल, इटारसी, खांडवा, भुसावळ, जलगाव, मनमाड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा मार्गे चेरलापल्ली येथे तीसऱ्या दिवशी सकाळी ३.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०४६४१ चेरलापल्ली अमृतसर विशेष गाडी: ही गाडी चेरलापल्ली येथून दि. २५ जानेवारी आणि २६ जानेवारी रोजी दुपारी ३.४० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच अमृतसर येथे तीसऱ्या दिवशी दुपारी ३.१० वाजता पोहोचेल.



गाडी क्र. ०४५२४ चंदीगड हुजूर साहिब नांदेड विशेष गाडी: ही गाडी चंदीगड येथून दि. २३ जानेवारी आणि २४ जानेवारी रोजी सकाळी ५.४० वाजता सुटेल आणि अंबाला, पानिपत, दिल्ली आगरा, झांसी, बिना, भोपाल, इटारसी, खांडवा, भुसावळ, मनमाड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा मार्गे हुजूर साहिब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी दुपारी १.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०४५२३ हुजूर साहिब नांदेड चंदीगड विशेष गाडी : ही गाडी हुजूर साहिब नांदेड येथून दिनांक २५ जानेवारी आणि २६ जानेवारी रोजी रात्री २१.०० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच चंदीगड येथे तिसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता पोहोचेल.

गाडी क्र. ०४४९४ हज़रत निज़ामुद्दीन हुजूर साहिब नांदेड विशेष गाडी : ही गाडी हज़रत निज़ामुद्दीन येथून दि. २३ जानेवारी आणि २४ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता सुटेल आणि पालवल, आगरा, झांसी, बिना, भोपाल, इटारसी, खांडवा, भुसावळ, जालगाव, मनमाड, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, पूर्णा मार्गे हुजूर साहिब नांदेड येथे दुसऱ्या दिवशी दुपारी ४.२० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०४४९३ हुजूर साहिब नांदेड हज़रत निज़ामुद्दीन विशेष गाडी : ही गाडी हुजूर साहिब नांदेड येथून दिनांक २४ जानेवारी आणि २५ जानेवारी रोजी रात्री ८.१० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच हज़रत निज़ामुद्दीन येथे दुसऱ्या दिवशी रात्री ११.२० वाजता पोहोचेल.

**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# ग्रीनलँड वाद: ट्रम्पची दादागिरी

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सगळ्या जगासाठी धोकादायक सिद्ध होत आहेत. केवळ आपल्या सैन्यशक्तीवर विसंबून जगातल्या प्रत्येक देशाला त्रास देण्याचे त्यांचे धोरण सुरू झाले आहे. हा त्यांच्या अविकसित बुद्धीचा परिपाक होय. आता त्यांचे अधोगतीच्या दिशेने एक पाऊल पुढे पडले असून ग्रीनलँडला घशात घालण्याचा त्यांचा उपक्रम सुरू झाला आहे. जागतिक राजकारणात ग्रीनलँडविषयी सध्या निर्माण झालेला वाद मागच्या पन्नास वर्षांतील धोरणांचा परिणाम आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँडवर नियंत्रण मिळवण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न सुरू केला आहे, पण तो सामान्य राजकीय चर्चेपुरता मर्यादित नाही. हा संघर्ष आता युरोप आणि अमेरिकेच्या द्विपक्षीय संबंधांवर खोलवर परिणाम करण्याच्या मार्गावर आहे. ट्रम्प यांनी जानेवारी २०२६ मध्ये जाहीर केले की, अमेरिकेला ग्रीनलँड पूर्णपणे खरेदी करायचे आहे, नाहीतर त्यांनी विरोध करणाऱ्या युरोपीय देशांवर निर्यात वस्तूंवर दुसऱ्या टप्प्यात २५ टक्क्यांपर्यंत कर लागू करण्याचा इरादा आहे. हे तात्कालिकपणे ऑगस्ट २०१९ मध्ये ग्रीनलँड विकत घेण्याच्या त्यांच्या पहिल्या प्रस्तावाचे पुनर्जागरण आहे, परंतु यावेळी ही घोषणा अधिक तीव्र स्वरूपात आणि आर्थिक ब्लॅकमेलच्या शैलीत आली आहे. ग्रीनलँड हा डेनमार्कच्या सार्वभौमत्वाच्या अधीन असलेला एक स्वायत्त प्रदेश आहे आणि त्याची सुरक्षा आणि संरक्षण यावर मतभेद आहेत. सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असलेला हा प्रदेश उत्तरेकडील ध्रुवीय भागाशी जोडलेला असून, सागरी मार्गांना, संरक्षण यंत्रणांना आणि तटबंध नियंत्रणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. युरोपच्या अनेक देशांनी ट्रम्पच्या या दबावपूर्ण धोरणांचे तीव्र निदर्शन केले आहे आणि त्यावर एकसंध पद्धतीने विरोध व्यक्त केला आहे. युरोपियन युनियनचे अध्यक्ष उर्सुला वॉन डेर्लेन यांनी सांगितले की, अशा प्रकारची करमूल्ये ट्रान्स-आटलांटिक संबंधांना धोकादायक आहे. त्यांनी स्पष्ट केले की युरोप एकजूट राहील, समन्वय साधेल आणि सार्वभौमत्वाच्या संरक्षणास कटिबद्ध राहील. फ्रेंच राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रोन यांनी ट्रम्पच्या रणनीतीची तुलना रशियाच्या आक्रमक धोरणासारखी केली असून, धमक्या आणि दबाव माध्यमांच्या वापराचा विरोध केला आहे. स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेज यांनी चेतावणी दिली की जर अमेरिकेने ग्रीनलँडवर हल्ला केला तर ते नाटोचा समाप्ती करणारे पाऊल ठरेल, ज्यामुळे पॅक्टमधील ऐक्य आणि विश्वास धोक्यात येईल. या राजकीय संकटाचा सर्वात त्रासदायक भाग म्हणजे युरोपियन देशांवर लागू होणाऱ्या करमूल्यांची धमकी. ट्रम्पच्या आदेशानुसार, डेनमार्क, नॉर्वे, स्वीडन, फ्रान्स, जर्मनी, युनायटेड किंगडम, नेदरलँड्स आणि फिनलंड यांच्यावरील निर्यात मालावर १ फेब्रुवारी २०२६ पासून १० टक्के शुल्क लागू होणार आहे, आणि जर ग्रीनलँडच्या खरेदीबाबत कोणताही करार झाला नाही तर जून १ पासून तो कर २५ टक्क्यावर वाढवला जाईल. ही धमकी सामरिक सुरक्षा किंवा राष्ट्रीय हित यापेक्षा पुढे जाऊन आर्थिक ब्लॅकमेल स्वरूपाची दिसते; कारण ग्रीनलँडचा निर्णय डेनमार्क आणि ग्रीनलँडच्या लोकशाही अधिकारांवर अवलंबून असणे अपेक्षित आहे, आणि तो फक्त अमेरिकेला विकला जाण्याच्या अधिकारावर नाही. ग्रीनलँड तथा डेनमार्क सरकारने स्पष्टपणे सांगितले आहे की, ग्रीनलँड विकायला नाही आणि तो त्यांच्या स्वायत्ततेचा भाग आहे. ट्रम्पच्या या दबावयुक्त निर्णयामुळे पाश्चात्य जगातील ऐक्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. नाटो सदस्य राष्ट्रांच्या युनियनमध्ये याबाबत तणाव स्पष्ट दिसून येतोय, कारण हे सदस्य राष्ट्र परस्पर सहयोगानेच सुरक्षा आणि स्थिरतेसाठी बांधील आहेत. युरोपियन परराष्ट्र पोलिसी प्रमुख काजा काल्लास यांच्या शब्दात, अशा प्रकारच्या दबावामुळे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसारख्या मंचांवरही याचा फटका बसू शकतो. आर्थिक परिणामदेखील गंभीर आहेत. अमेरिकेने युरोपियन देशांवर टॅरिफच्या धमक्या दिल्यामुळे युरोप आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करार, जसे की युनियन-विरुद्ध-युनायटेड स्टेट्स ट्रेड डील, आता संकटात आहे. काही वृत्तानुसार, युरोप संभाव्य प्रतिसादात्मक उपाय योजण्याची तयारी करत आहे ज्यामध्ये अमेरिकन वस्तूंवर बंदी घालणे किंवा व्यापार क्षेत्रातील सहकार्यांना पुनर्विचार करणे यांचा समावेश आहे. या तणावामुळे एक मोठी गोष्ट समोर आली आहे की, विश्वराजकारणात स्वतंत्र निर्णय आणि सार्वभौमत्व यांना ऐक्याच्या संबंधांपेक्षा जास्त महत्त्व आहे. ग्रीनलँडवरील हा वाद, जरी तो भौगोलिकदृष्ट्या लहान आणि मानवसंख्येने कमी असलेला प्रदेश असला तरी, हा संकटाचे मुख्य कारण अमेरिकेची दादागिरी आणि वसाहतवादी वृत्ती होय. या प्रकरणाने स्पष्टपणे दाखवले की, आंतरराष्ट्रीय संबंध आज केवळ सैन्यशक्तीवर अवलंबून नाहीत; ते आर्थिक धोरणे, व्यापारी कार्यवाही आणि राजकीय दबाव यांच्या मिश्रणातूनही आकार घेत आहेत. या तणावाचा परिणाम भविष्यातील नाटो सहकार्य, व्यापार वाटाघाटी, आणि आर्क्टिक भागातील सामरिक धोरणांवर खोलवर पडेल, हे नक्की आहे. विश्वातील जागतिक नेतृत्त्वासाठी एक मानवी धडा असा आहे की, राजकीय संवाद, परस्पर विश्वास आणि सार्वभौमत्वाच्या सन्मानाशिवाय कोणताही दीर्घकालीन राजकीय संबंध टिकून राहू शकत नाही. आजच्या घडीला ग्रीनलँड वाद हे याच धड्याचे एक ज्वलंत उदाहरण बनले आहे.

# धर्माची शिकवण आणि आपत्तीत मदतीचा हात...!

शिख धर्मियांचा एक मोठा उपक्रम साजरा करताना या धर्माने विविध क्षेत्रात दिलेले योगदान आपण बघितले पाहिजे. त्यात सेवा आणि निस्वार्थ सेवा याकडे आपण लक्ष द्यायलाच हवे. पूर असो वा भूकंप किंवा इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती यात निःस्वार्थ सेवा या समुदायाकडून दिल्ली जाते. गरजूंना (सामुदायिक स्वयंपाकघर) अर्थात लंगरच्या माध्यमातून अन्न व निवारा देण्यासोबतच आपत्तीतून सुटका करणे व आवश्यक ते मदत कार्य करणे यासाठी शीख स्वयंसेवक योगदान देतात.



सेवा भाव अर्थात सेवा करवाना धर्म-पंथ याचा भेद न पाळता सर्वांना माणुसकीच्या नात्याने शक्यतोपरी मदतीचा हात स्वयंसेवक देताना जगभरात आपणास दिसतील.

गुरुद्वारांमध्ये २४ तास अखंड सेवा,मदतीचा एक भाग बनते त्यावेळी गरजूंना अन्न पुरवण्याचा मोठा स्रोत समाजासाठी खुला होतो.

जगभरात 'खालसा एड' (Khalsa id) च्या माध्यमातून आपत्तीच्या काळात मदत पुरवली जाते. यात शीख स्वयंसेवक जगभरात सर्व भौगोलिक सिमांच्या पलिकडे जाऊन मदत करतात.

आपत्ती काळात जी विविध कामे होतात त्यात भोजन व पिण्याचे पाणी पुरविणे, तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करणे व बचाव कार्यात सहभाग अशी विभागणी आपणास दिसते. यात सर्वाधिक मोलाचे कार्य म्हणजे आपत्तीच्या काळात पिडितांना भावनिक आधार देणे होय. आपत्तीत आप्त स्वकियांना गमावलेल्यांना मोठा मानसिक धक्का बसलेला असतो अशा सर्वांना भावनिक आधार देणे महत्वाचे असते हे काम स्वयंसेवक करतात.

शीख धर्मावर आणि धर्मतत्वांवर आधारित अशी आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था म्हणून 'खालसा एड'ची जगभरात ओळख आहे. केवळ धार्मिक शिकवण न राहता आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणारी एक महत्वाची ताकद म्हणून या स्वयंसेवी संस्थेला ओळख मिळाली आहे.

याच स्वरुपाचे आपत्तीकाळात काम करणारी आणखी एक स्वयंसेवी संस्था म्हणजे 'युनायटेड शिख होय. या संस्थेने २०२५ मध्ये पंजाब मध्ये आलेल्या महापूरातून लोकांना सावरण्यास खूप मोठी मदत केली .या भूतो-न-भविष्यती महापूरामध्ये पंजाबात अतोनात नुकसान झाले. गावेच्या गावे यात बुडाली. अनेकजण विस्थापित झाले. घरे आणि शेती याचेही या पुरात मोठे नुकसान झाले.

या काळात २००० हून अधिक जणांची पुरातून सुखरूप सुटका करण्यासोबतच ८ हजाराहून अधिक नागरिकांना वैद्यकीय उपचार तसेच तात्पुरता निवारा, अन्न, पिण्याचे शुद्ध पाणी, वस्त्रे आणि गरजेचा शिधा पुरविण्यात या संस्थेने पुढाकार घेतला. या पुरात ८७ हून अधिक गावात पूर्णतः नुकसान झाले. यातील अनेकांना आर्थिक मदतीची गरज लागणार आहे यासाठी, एक लक्ष डॉलरचा निधी उभारण्याचे काम ही संस्था करीत आहे.

नैसर्गिक आपत्ती कोणत्या स्वरुपात समोर येईल हे सांगता येत नाही. या काळात मानवता वादी दृष्टीकोण आणि निःस्वार्थ सेवा याचा वस्तुपाठ शीख बांधवांनी जगासमोर सादर केलाय असं म्हणता येईल.

**-प्रशांत दैठणकर,**
नांदेड
९८२३१९९४६६

# बाह्य बदलापेक्षा अंतरिक बदल आवश्यक

एकदा मी माझा उपवास आहे म्हणून, कुठे काही खायला मिळेल का, म्हणून त्या प्रचंड झगमगाट असलेल्या शहरात भटकत असताना, तिथे एका दुकानात केळ दिसली. मला आश्चर्य वाटलं, की इथे दुकानात केळ मिळतात. चला आपणास उपवास आहे, म्हणून मी तिकडे जाऊन त्या केळांबद्दल दुकान मालकास विचारले, तर त्याने मला सांगितले, की ती केळ विकायचे नाहीत, पण मी खूप आग्रह केला व त्यांना त्या केळी मला विकत द्यायला सांगितल्या, त्यावर शेवटी माझ्या आग्रहाखातर त्यांनी मला केळी दिल्या. आता आपणास ती केळ खायला मिळणार हा मनातील आनंद गगनात मावेनासा झाला. ती केळ घेऊन दूर निवांत बसून खाण्याचा विचार डोक्यात आला व मी तसे करत असताना, मला आश्चर्याचा धक्काच बसला व त्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न आजही करतो आहे. झाले असे, की केळांची साल निघता निघेना, खूप प्रयत्न केल्यावर लक्षात आले, की ती केळ वास्तवात केळ नव्हतीच, तर ती प्लास्टिकची (शोभेची) केळीची हुभेहुभ प्रतिकृती होती. म्हणजे ती केळ प्लास्टिकची होती.

या वरील गोष्टीवरून काय लक्षात येते, की ती फक्त दिसायला केळी होती, पण असायला नव्हती. आता इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की बऱ्याच गोष्टी दिसायला असतात, पण असायला नसतात. यावरून मी त्यांचे तीन गटात वर्गीकरण करतो. १) काही वस्तू व बाबी दिसायला असतात, पण असायला नसतात. उदा : वरील सांगितलेली प्लास्टिकची केळी. २) काही वस्तू मात्र असायला असतात, पण दिसायला नसतात. उदा: दुधात लोणी आहे, पण ते दिसायला नाही, ते असायला आहे, पण दिसायला नाही. ३) याउलट काही बाबी व वस्तू दिसायला व असायला पण असतात. उदा: सगळ्याच भौतिक वस्तू.

आता नेमकी हीच बाब खूपच चिंतनीय आहे. आपण आज आधुनिक जगात जगतोय, किंबहुना त्याही पुढचं उत्तर आधुनिक जीवन जगतोय. आम्ही खूप आधुनिक झालोय व आम्ही समाजात खूप बदल केलाय, या भ्रमिष्ट बेडीत आपण सारे आडकलोय. आपण आजचे आधुनिक जीवन वरील गट १ प्रमाणे जगतोय. अर्थातच याला काही अपवाद आहेत पण ते अपवाद अगदी नगण्य असून, आपणास समग्रास प्राधान्य द्यायचे आहे. आपण गट २ नुसार आपल्या जगण्यात बदल करणे अपेक्षित आहे. हा बदल कायम व अमूर्त तसाच अंतरंगातील आहे. पण आज आधुनिक व बाह्य बदलाचा दिवा, हातात घेऊन पुढे जाताना, आपण हे विसरलोय, की त्याच दिव्याखाली अंतरंगातील बदलाचा अंधार पसरला आहे. असे म्हणतात की, जे जसं दिसतं, ते तसं नसतं.

खरंच हे भयानक वास्तव, आज मूर्त रुपात दिसून येत आहे, कारण, आजचा भौतिक माणूस, केवळ तो बदलला आहे या भ्रमात, मनमुराद जीवन जगतोय. आता चिंतन याचे करावयाचे आहे, की खरंच आपण बदल केलाय का? जो बदल आपण केलाय, असे फक्त आपणास वरवरून भासत आहे, हा बदल केवळ दिसायला आहे, पण तो असायला नाही. बदलाची गती ही खूप हळू असते. पण आजचा भौतिक बदल वाऱ्याच्या वेगाने होत असून, तो केवळ आर्धे व बाह्यरूप धारण करून, आपले मूर्त व नाशवंत साम्राज्य पसरवत आहे. कारण वास्तविक बदलाची, गती संथ असते.

जर प्राचीन काळापासून विचार केला, तर सर्वात अगोदर सामाजिक बदल करण्याचा प्रयत्न, गौतम बुध्दांनी केला. त्यानंतर संतांनी पुन्हा सुधारकांनी, पण सामाजिक परिवर्तन करण्यासाठी खूप प्रयत्न केले. मग त्यानंतर संविधानात, पण अनेक कायदे करूनही, खरंच आपण बदललो का? तर नाही, असेच याचे उत्तर असेल. आपण जी बदलाची टिमकी वाजवतो, ती केवळ भौतिक स्वरूपाची असून, ती फक्त वर सांगितल्याप्रमाणे दिसायला आहे, पण असायला नाही. मग आसने म्हणजे काय असते, तर त्यात फक्त अमूर्त, अंतरंगातील बदलांचा समावेश होतो. जे काही अमूर्त आहे, तेच शाश्वत व सत्य असते. त्यात वरवरचा व भ्रमिष्ट बदल अपेक्षित नसून आतून, वैचारिक दृष्टीतून माणूस बदलावा व त्या बदलाने इतर लोकांमध्ये पण सकारात्मक व समाज उपयोगी बदल घडवून आणावा हे त्याचे खरे रूप आहे.

आकाश लहान वाटेल, एवढ्या उंच इमारती आपण आज उभ्या केल्या, पण बाजूला झोपडीतील गरिबी आणखी शिल्लक आहे. धार्मिक निरपेक्षता कितीही मिरवली, तरी धर्मा धर्मावर आधारित भांडणे, मारामाऱ्या यांचे अनेक दाखले आजही आढळतात. जातीपातीच्या भिंती आपण कितीही जरी मोडून काढण्याचा प्रयत्न केला, तरी भयाण वास्तवाचं चित्र काही वेगळंच आहे. हा सामाजिक भेदाचा शाप आपल्याला असा काही चिकटून बसलाय ,की आपण कितीही आधुनिक जीवन जगलो, तरी ती बाब आपल्या मनात, जीवनात इतकी ठासून बसलीय, की तिच्यासाठी आपणास अंतरंगातील बदल आवश्यक आहे. लोकसंख्या,प्रदूषण,बेरोजगारी, दहशतवाद, नक्षलवाद, प्रांतवाद, सामाजिक विषमता, धर्मनिपेक्षतेच्या समस्या यामध्ये हवा तेवढा बदल, आणखी झालेला नाही, ही वस्तुस्थिती आपणास नाकारता येणार नाही. जरी आपण फार बदल झालाय, असा आव आणत असू ,तरीही प्रत्यक्ष चित्र फार वेगळं व भयावह आहे.

दिवसेंदिवस स्त्रियांवरील बंधने,अत्याचार, बलात्कार, या व इतर अनेक अन्याय ग्रस्त बाबी, आजही तोंड काढून आपणासमोर उभ्या आहेत.. मग हाच आपला बदल आहे का? तर नाही, यासाठी असा बदल आवश्यक आहे, की जो भलेही दिसायला नसेल पण असायला पाहिजे. असे म्हणतात की, जर नसेल अंतर मन निर्मळ तर काय करेल साबण.

आपण जर आतल्या, म्हणजे अंतरंगातील बदलास प्राधान्य देत, भौतिक बदल घडवला, तर आपण खरेच बदललो असे होईल. डॉ. अब्दुल कलाम यांना, भारत २०२० पर्यंत जागतिक महसत्ता बनवायचा होता. आता आपण किती बदल केलेत व कलामांना अपेक्षित असलेला भारत, आणखी किती दूर आहे हे आपण इथे आवर्जून लक्षात घेतले, तर आपल्या भ्रमाचा भोपळा फुटेल व आपणास वास्तवाची जाणीव होईल. अलीकडेच आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केला. आता हे जे स्वातंत्र्य आपण मिळवले त्यात समग्रतेचे दर्शन होते का? म्हणजे सर्वसामान्य माणसाला ह्या स्वातंत्र्याचा उपयोग आहे का?

आपल्याला घटनेने दिलेल्या आचार, विचार स्वातंत्र्याचा हक्क खरच दिला जातो का? की आपला आवाज दाबला जातो...? या बाबीचा विचार होणे आवश्यक आहे. आजही अनेक ठिकाणी सामान्य माणसाला माणूस म्हणून जगताना, किती सामाजिक भेद, विषमता या व अनेक बाबींचा सामना करावा लागतो. मग आपण खरच बदललो का ? आजचा आधुनिक बदल म्हणजे, नव्या बाटलीत जुनीच औषधी देणे आहे. याने रुग्ण बरा होईल का? समाजातील स्त्रियांकडे आजही भोगवस्तू म्हणूनच पाहिले जाते. आपण स्त्रीमुक्ती दिन साजरा केला म्हणून ती खरंच मुक्त आहे का? नाही, हा बदल केवळ दिसायला आहे, पण तो असायला नाही. आजही बऱ्याच ठिकाणी स्त्रीची अवस्था नखे नसलेली वाघीण अशी दिसते. आपला तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आजही मलीन आणि विशुद्ध आहे. रस्त्यावरील हल्ले, विनयभंग, बलात्कार या बाबींचे दाखले, आपण खरच परिवर्तन आणले आहे का? याची चाचपणी करण्यासाठी पुरेशा आहेत. स्त्रीकडे पाहण्याची आपली नजर सापासारखी असून, तिला दंश करण्यासाठी, पुरुषरुपी साप टपून बसलेले असतात. ग्रामीण स्त्रियांचे प्रश्न आजही तसेच बेवारस स्थितीत आहेत, त्यात फारसा बदल झालेला नाही. यासोबतच गरिबीचा भयानक प्रश्न उभा असून, एकीकडे श्रीमंती रुपी चंद्र आहे, तर दुसरीकडे दारिद्र्य रुपी अंधाराची रात्र आहे, ही बाब आपणास काय दर्शवते?. आपण कितीही समृद्ध झालो असलो, तरीही सगळ्यात मोठा गरिबी, बेकारी यांचा प्रश्न आणखी सोडवू शकलो नाहीत, त्यामुळे मुठभर श्रीमंत लोक म्हणजे पूर्ण देश किंवा समाज नव्हे. काही लोक आधुनिक जीवन जगतात, म्हणजे ते समग्र परिवर्तन आहे का?. म्हणून विचारातून, आचरणातून, अमूर्त स्वरूपाचे परिवर्तन व बदल हाच बदलाचा आदर्श नमुना असू शकतो. कितीही आधुनिक जीवन जगले, तरीही व आपण बदल करण्यात यशस्वी झालो आहोत, असे म्हणून कितीही दवंडी पिटवून पुढे गेलो, तरी वास्तवाचे चटके फार भयानक असतात.

केवळ भौतिक बदल म्हणजे सायकलचे एक चाक धावत असून, आपण पुढे जातोय ही बाब मनाला फसवे समाधान देणारी आहे. पण वास्तव हेच आहे, की सायकल दोन्ही चाकावर अवलंबून असते, म्हणून समाज रुपी सायकलचे, केवळ भौतिक चाक धावून फायदा नाही, तर त्याचे बौद्धिक,वैचारिक, अमूर्त चाक पण चालवावे लागेल व तेव्हाच आपण खरा व वास्तविक बदल करण्यात यशस्वी झालो असे म्हणता येईल. नाहीतर वरवरचा बदल, सुरवातीस वर उल्लेख केलेल्या केळा प्रमाणे, केवळ दिसायला असेल, पण असायला असणार नाही. स्वातंत्र्य प्राप्त करून आज साडे सात दशक उलटून गेली व आपण केवळ भौतिक बदल घडवला म्हणजे आपण केवळ अर्धा भाग घेऊन पुढे जातोय. हा केवळ भौतिक झगमगाट असून, तो केवळ दिसायला आहे. म्हणून जो बदल आतून आहे, कायम आहे, सत्य व आमर आहे असा बदल म्हणजे विचारातील व आपल्या आंतरिक दृष्टीतील होय. मग हीच आंतरिक दृष्टी, आपण समाजात सगळ्याच बाबतीत वापरली, तर हे सामाजिक भेदाचे चक्र भेदायला मदत होईल.पण त्यासाठी ह्या बाह्य बदलास, आंतरिक बदलाची जोड देऊन, समाज रुपी सायकलचे दोन्ही चाक धावते ठेवावे लागतील. म्हणून, आजचा आधुनिक बदल अमूर्त व आंतरिक बदला शिवाय अर्धा व अपूर्णच राहणार असून त्याला पूर्णत्व देण्याचे सर्वात महत्त्वाचे स्त्रोत आपणच आहोत...

नको रे केवळ दिसण्यावर जाऊ,
हे आधुनिक माणसा, आतून
असण्यावर पूर्ण लक्ष देऊ.

**-प्रा. अमित शिंदे**
मु. पो. रोही पिंपळगाव
ता. मुदखेड, जि. नांदेड.
मो. ९७६७८५१०४६

# जशी दृष्टी तशी सृष्टी

वेदना, दुःख कुणाचेही असो त्याची दाहकता सारखीच असते. आपण मात्र आपल्याच वेदनेला व दुःखाला कुरवाळत बसतो. कळत-नकळत इतरांच्या वेदना व दुःख याला महत्त्व देत नाही. कदाचित यामुळेच स्व दुःख भारी पर दुःख शितळ ही बोली भाषेतील म्हण रूढ झाली असावी. जीवन जगताना नेहमी काय चुकले...? आणि ते कसे दुरुस्त करता येईल....? याचा विचार होणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र कोणाचे चुकले...? आणि ते कसे सिद्ध करता येईल...? याचा प्रयत्न चालू असतो. प्रत्येक वेळी प्रत्येक गोष्टीत प्रत्येक जण दुसऱ्याची चूक काढण्यामध्ये जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करतो. दुसऱ्याची चूक शोधूनही काढतो. जमेल त्या पद्धतीने झालेली चूक निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करतो. वेळप्रसंगी ती चूक सिद्धही करतो. एवढा सर्व अट्टाहास करून दुसऱ्याला चुकीचा ठरवून दुसऱ्या बाजूला आपण बरोबर असल्याचे कळत नकळत घोषित करून टाकतो. पण प्रत्येकजण एक विचार पूर्णपणे विसरून जातो की, दुसऱ्याला चुकीचे ठरवून आपण बरोबर आहोत हे सिद्ध होत नाही. दुसऱ्याला लहान ठरवून आपण मोठे सुद्धा होऊ शकत नाही. माणूस म्हटले की, चुका होणारच. प्रत्येक माणूस चुकत असतो. फक्त झालेल्या चुकीतून शिकता आले पाहिजे...चूक स्वीकारली पाहिजे आणि झालेली चूक सुधारता आली पाहिजे. म्हणून केवळ चुका काढून बघत नाही तर त्या कशा सुधारता येतील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.



आपले संपूर्ण जीवन आपल्या सभोवती फिरत असते. आपल्या जीवनातला सर्वात महत्त्वाचा घटक आपण स्वतः असतो. आपल्यापेक्षा इतर कोणीही महत्त्वाचे नसते. हेच वास्तव आहे आणि हीच वस्तुस्थिती आहे. तरीही हे कोणी मान्य करत नाही. कोणी मान्य करो अगर ना करो...अटीतटीचा, आणीबाणीचा काळ आला की; स्वतः एवढे महत्त्वाचे कुणीच नाही. माणूस स्वतःपेक्षा जास्त कुणावरही प्रेम करत नाही. हे आपोआप सिद्ध होते. असे असले तरी माणसाला स्वतःला जगण्यासाठी आणि सुखी, समाधानी, आनंदी राहण्यासाठी सर्वांचीच गरज असते.

जीवनाचा अनुभव संपन्न सार सांगणारे आजी-आजोबा हवे असतात. जन्मदाते आई-वडील हवे असतात. प्रत्येकाला भाऊ-बहीण, मित्र-सवंगडी हेही आवश्यक असतात. आयुष्याला प्रत्येक सुखा-दुःखाच्या प्रसंगाला साथ-सोबत करणारा जीवनसाथी-जोडीदार हवा असतो. मुलगा-मुलगी, लेकरं-बाळ हवे असतात. असे बहरलेल्या गोकुळासारखे संपूर्ण परिपूर्ण कुटुंब हवे असते. या कुटुंबाच्या अनुषंगाने काका-काकी, मामा-मामी, आत्या, मावशी यासारखे जीवाभावाचे सर्व नातेवाईक पाहिजे असतात. कुटुंबात, नात्यात, नातेवाईकात, आप्तस्वकीयात आणि मित्रपरिवारात सामंजस्य, एकमेकांना आधार देण्याची क्षमता, भावनिक ऊर्जा देण्याची ताकद, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा आपुलकी असणे महत्त्वाचे असते. तरच या सगळ्यांना नात्यांना अर्थ असतो. तर या सगळ्यांपासून आपल्याला आधार मिळतो. मानसिक बळ मिळते. कुटुंबाचा, नात्याचा माणसाला आधार वाटला पाहिजे. घरी आल्यानंतर तुम्हाला मन: शांती मिळावी. बाह्य जगातले सगळे ताण-तणाव आणि प्रश्न कितीही मोठे असले; तरी ही माणसे माझी ऊर्जा स्थान आहेत यांच्यासाठी मला लढायचे आहे. असे वाटले पाहिजे. समजा असे होत नसेल तर मात्र कुटुंबाच्या समस्या सुटता सुटत नाही. नात्यांचा गुंता वाढत जातो. कुटुंबात, नात्यात आक्रमकतेने प्रश्न सुटत नाहीत तर ते सामंजस्याने सुटतात. म्हणून इथे सामंजस्याची चढाओढ हवी. इथे स्वार्थाचा उपयोग नाही तर त्याग, समर्पणाची स्पर्धा असायला हवी.

खरेतर प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, माया, ममता, वात्सल्य या भावना सहज निर्माण होत नाहीत. त्या आपल्या वागण्या-बोलण्यातून निर्माण कराव्या लागतात. सुरुवात आपल्या स्वतःला करावी लागते. आपण सर्वांसोबत चांगले वागावे लागते. प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा प्रथमतः आपण आपल्या वागण्या-बोलण्यात प्रामाणिकपणे उतरवायचा असतो. तसे वागायचे असते.

एकमेकांविषयांचा आदर, एकमेकांची कदर करणे फार गरजेचे असते. आपण माया लावली तरच दुसरे लोक आपल्याला प्रेम, माया, आपुलकी आणि जिव्हाळा लावत असतात. तुमच्या स्वतःच्या वागण्यात, बोलण्यात जे असेल तेच समोरून आपल्याला मिळत असते. तुम्ही कसे आहात यावरून इतर लोक तुमच्या सोबत कसे वागतील हे ठरत असते. म्हणूनच म्हणतात... जशी दृष्टी तशी सृष्टी.

तुमची दुसऱ्यांना समजून घेण्याची वृत्ती असेल तर तुम्हाला मला समजून घ्या... म्हणण्याची आवश्यकता नाही. लोक तुम्हाला समजून घेतातच. दुसऱ्याचे म्हणणे शांतपणे आणि त्याच्या भूमिकेत शिरून ऐकून घेण्याची प्रवृत्ती तुमच्या अंगी असेल तर लोक तुम्हाला नेहमी आपुलकीने बोलतात. आपले दुःख, वेदना, आणि संवेदना सांगत असतात. तुमचा ऐकून घेण्याचा सुद्धा त्यांना आधार वाटत असतो. ज्यावेळी तुम्ही दुसऱ्याचे दुःख समजून घेता. त्यावेळी समोरची व्यक्तीही तुमचे सुख-दुःख आणि वेदना समजून घेत असते. प्रत्येक वेळी प्रत्येक विषयावर आपण बोललेच पाहिजे किंवा आपले मत मांडलेच पाहिजे असे नसते. बराच वेळा दुसऱ्याचे मत समजून घेणे, दुसऱ्याच्या भावना समजून घेणे हेही फार महत्त्वाचे असते. प्रत्येक गोष्ट चूक किंवा बरोबर ठरवता येत नसते. प्रत्येक माणसाची धारणा आणि दृष्टिकोन वेगळा असतो. प्रत्येकाची मते वेगवेगळी असतात. कोणत्याही प्रसंगावरून किंवा घडलेल्या घटनेवरून प्रत्येकाला वेगवेगळ्या भावना वाटू शकतात. प्रत्येकाने आपल्याच दृष्टीने बघावे हा अट्टहास निरर्थक आहे. प्रत्येक बाबी, प्रसंग आणि गोष्टी सुद्धा व्यक्तिनिष्ठ असतात.

नेहमी आपल्या माणसांना भेटा, त्यांचे ऐकून घ्या. त्यांना समजून घ्या. तुम्हीही भरभरून बोला. एकमेकांशी सुसंवाद ठेवा. संवादातून गैरसमज करून घेऊ नका. एखाद्याचे आपल्याबद्दल बोलणे चुकले असेल तर त्याला संयमाने, शांतपणे तशी जाणीव करून द्या. समोरची व्यक्ती त्याची चूक नक्की सुधारेल फक्त प्रेमाने सांगून बघा. प्रत्येक बोलण्याचे-वागण्याचे संदर्भ वेगवेगळे असतात. प्रत्येक गोष्टीचा आपल्या परीने अर्थ काढून गैरसमज करून घेऊ नका. दुसऱ्याला नेमके काय सांगायचे आहे...? आपल्या कृतीतून काय सिद्ध करायचे आहे...? हे पूर्णपणे समजून घ्या. वरवर चुकीचा किंवा आपल्या सोयीचा अंदाज काढू नका.

प्रेम, माया, आपुलकी, जिव्हाळा, सुख, समाधान, आनंद, दुःख, भिती, राग या मानवी मनाच्या सगळ्याच भावना बहुआयामी आहेत. या सर्व भावनांचे वेगवेगळ्या प्रसंगातील स्थान समजून घ्या. प्रसंगानुरूप आवश्यक आणि योग्य भावना प्रकट झाली पाहिजे. मुळात कोणतीच भावना वाईट नसते प्रसंगाशी, गोष्टीशी विसंगत भावना चुकीची ठरते. म्हणून प्रसंग आणि गोष्टी बारकाईने समजून घ्या. उदाहरणच द्यायचे झाले तर प्रेम ही भावना विविध अंगी, व्यक्ती व नात्यापरत्वे वेगवेगळी आहे. प्रेमासारख्या व्यापक भावनेला बंदिस्त करू नका. प्रेमाचा एकाच अर्थाने विचार करू नका.

बऱ्याचशा गोष्टी गैरसमजातून उद्भवतात. म्हणून जीवन चांगल्या प्रकारे समजून घ्या. कधीच आणि कोणत्याच बाबतीत गैरसमज करू नका. छान, मोकळे, स्वच्छ आणि स्वच्छंदी जीवन जगा. हे जीवन पुन्हा पुन्हा नाही. स्वतः आनंदात जगा आणि दुसऱ्यालाही आनंदात जगू द्या. छोट्या-छोट्या गोष्टीत अडकून पडू नका. हे जग फार विशाल आहे.

जसे आपले अस्तित्व आणि व्यक्तिमत्व महत्त्वाचे आहे; तसे प्रत्येक माणसाचे अस्तित्व आणि व्यक्तिमत्व तेवढेच महत्त्वाचे आहे. याच्याही पुढे जाऊन सजीव सृष्टीतील प्रत्येक जीवाचे अस्तित्व तितकेच महत्त्वाचे आहे. एकमेकांच्या अस्तित्वाची, व्यक्तिमत्वाची, भावनांची, सुख-दुःखांची, कर्तुत्वाची कदर करायला शिका प्रत्येकाविषयी आदर बाळगा. एकमेकांविषयी सहानुभूती ठेवा. एकमेकांचा आधार बना.

या व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टीने जीवनाकडे बघा. फक्त लोकांच्याच चुका काढू नका. आपल्याही चुका शोधा आणि त्या सुधारा. म्हणून म्हणतोय विचार करताना...आपण चुकत आहोत का...?

**-मयुर मधुकरराव जोशी**
ग्रीन पार्क जिंतूर, जि. परभणी
मो. ९७६७७३३५६०

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय


# ऑफिसमध्ये काम करताना झोप येतेय?

**बऱ्याच वेळा अभ्यास करताना किंवा काम करत असताना आपल्याला झोप येते. याचे कारण म्हणजे बराच वेळ आपण एका ठिकाणी बसून राहतो म्हणून असा कंटाळा येणे शक्य आहे. पण ऑफिसमध्ये असताना कामावर लक्ष केंद्रित करणे किंवा अभ्यास करत असताना पूर्ण लक्ष अभ्यासावर ठेवणे आवश्यक असते. अशात जर तुम्हाला जास्त झोप येत असेल तर काही उपाय करून तुम्ही या आळसापासून सुटका मिळवू शकता. कोणते आहेत ते उपाय जाणून घेऊया...**



- पौष्टिक आहार निवडा : तज्ज्ञांच्या मते झोप टाळण्यासाठी पौष्टिक आहार घेणे आवश्यक आहे. जर आपण जास्त तळलेले किंवा चरबीयुक्त अन्नपदार्थ खाल्ले तर त्यामुळे सुस्ती येण्याची शक्यता असते. कामाच्या दरम्यान झोप येऊ नये म्हणून सूप व सॅलड्स, मसूर, भरपूर फळे, भाज्या यांसारख्या पोषक आणि फायबरने समृद्ध असा आहार घ्यावा.
- पॉवरनॅप घ्या : अभ्यासासाठी किंवा कामासाठी अनेक तास एकाच जागी बसल्यावर झोप येणे साहजिक आहे. अशावेळी तुम्ही पॉवरनॅप घेऊ शकता. पॉवर नॅप तुमच्यासाठी एनर्जी बूस्टर ठरेल. यामुळे तुम्हाला नक्की फ्रेश वाटेल.
- पुरेसे पाणी प्या : पुरेसे पाणी न प्यायल्याने काम करताना किंवा अभ्यास करताना झोप येऊ शकते. एका अभ्यासानुसार, कमी पाणी प्यायल्याने आळस येण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे.
- चालणे : ऑफिसमध्ये काम करत असताना किंवा अभ्यास करत असताना मध्ये थोडा ब्रेक घेऊन तुम्ही चालू शकता, यामुळे तुमच्या शरीरातील रक्ताभिसरण (Blood Circulation) सुधारेल आणि तुम्हाला फ्रेश वाटेल.
- चहा किंवा कॉफी : झोप टाळण्यासाठी तुम्ही चहा किंवा कॉफी पिऊ शकता. चहा आणि कॉफीमध्ये कॅफिन असते हे झोप उडवण्यासाठी गुणकारी मानले जाते. पण लक्षात ठेवा की जास्त प्रमाणात चहा-कॉफी प्यायल्यानेही आरोग्यावर वाईट परिणाम होतो. त्यामुळे मर्यादित प्रमाणात चहा किंवा कॉफीचे सेवन करा.





# विंटर ट्रिप!

**यंदाच्या हिवाळ्यात एखाद्या पर्यटनस्थळी जाण्याचा विचार करत असाल तर तुमच्यासाठी काही खास टिप्स. स्वतःच्या गाडीने लांबचा प्रवास करण्यापूर्वी तुमच्याबरोबर या गोष्टी असायला हव्यात.**

- ब्लँकेट : थंडीच्या दिवसात लांबचा प्रवास करायचा असेल आणि प्रवासात ब्लँकेट नसेल, तर गारठून जाण्याची वेळ येऊ शकते.



थंडीमध्ये उब देणारं ब्लँकेट प्रत्येकाच्या गाडीमध्ये असायलाच हवं.
- फर्स्ट एड किट : गाडीला काही अपघात झाला किंवा तुम्हाला प्रवासात कुठे तरी लागलं तर प्रथमोपचाराचं साहित्य तुमच्या सोबत असणं गरजेचं आहे. या फर्स्ट एड किटमध्ये कोणती औषध आहेत, आणि ती केव्हा वापरावीत या गोष्टी घरातल्या सर्वांनी शिकून घेणंही गरजेचं आहे.
- जादा उबदार कपडे : लांबच्या प्रवासाला जात असाल तर तुमच्याकडे उबदार कपड्यांचा एखादा जादा जोड असणं गरजेचं आहे.
- जंपर केबल : एखाद्या थंडगार सकाळी तुम्ही प्रवासाला निघालात आणि तुमची गाडी काही केल्या सुरू होत नसेल तर थंड पडलेल्या इंजिनला सुरू व्हायला थोडा वेळ द्यावा लागतो. अशा वेळी दुसऱ्या एखाद्या वाहनाने आपली गाडी थोड्या अंतरापर्यंत खेचून नेण्यासाठी जंपर केबलचा वापर करता येईल.
- फ्लॅश लाइट : प्रवासात काही कारणास्तव वाटेत थांबावं लागलं तर सिग्नल म्हणून, किंवा एखाद्या अंधाऱ्या रात्री पाहण्यासाठी फ्लॅश लाइट तुमच्याबरोबर हवा. शिवाय, थंडीच्या दिवसांमध्ये धुकं पसरलेलं असतं. त्यामुळे धुक्यात पाहता यावं यासाठी प्रखर उजेड असलेली आणि संपूर्ण चार्ज केलेली फ्लॅश लाइट सोबत ठेवा.
- पोटभर खाऊ : थंडीमध्ये प्रवासाला निघालेले असताना काही खाद्यपदार्थही घेऊन ठेवा. थंडीमध्ये जास्त भूक लागते. त्यासाठी तुमच्यासोबत खाण्याचे भरपूर पदार्थ असायला हवेत.
- रेडिओ : प्रवास करताना गाणी ऐकणाऱ्यांची संख्या अधिक असली, तरी फक्त तेवढंच नव्हे, रेडिओही ऐकत राहा. एखाद्या लांबच्या ठिकाणी जाताना ट्रॅफिक कुठे आहे, महामार्गावर मोठा अपघात वगैरे झालाय का अशी माहिती रेडिओवरच तुम्हाला मिळू शकते.
- जादा मोबाइल : घरातला एखादा जुना, वापरात नसलेला मोबाइल फोन आपल्या गाडीमध्ये संपूर्ण चार्ज करून ठेवायला हरकत नाही. एखाद्या दूरच्या प्रवासात तुमच्या फोनची बॅटरी संपली, तर अशा वेळी हा जादा फोन तुमच्या कामी येऊ शकतो.
- जादा टायर : एखाद्या प्रवासात तुमच्या गाडीचा टायर पंक्चर झाला आणि आसपास कोणी मॅकनिक नसेल, तर एखादा जादा टायर आपल्या गाडीत हवा. प्रवासात एखाद्या ठिकाणी अडून न राहता पुढे जाण्यासाठी हा जादा टायर उपयोगी पडू शकतो.
- टूल कीट : एखाद्या वेळी गाडीत छोटा बिघाड झाला तर ती आपल्याला दुरुस्त करता आला पाहिजे. यासाठी गाडीमध्ये टूल कीट असणं गरजेचं आहे. ढिल्या झालेल्या स्क्रूपासून, पंक्चर झालेला टायर बदलण्यापर्यंत गाडीतल्या लहान मोठ्या गोष्टी दुरुस्त करता येतील अशा गोष्टी या टूल कीटमध्ये प्रामुख्याने असाव्यात.

## हेही महत्त्वाचे...

- थंडीमुळे प्रवासादरम्यान पाय आणि शरीराचे सांधे आखडण्याची शक्यता असते. त्याचा नंतर त्रास होऊ शकतो. त्यामुळे ठराविक वेळाने गाडी असेल तर ती थांबवून खाली उतरा. रेल्वेमध्ये असाल तर एखादी चक्कर मारून या. त्यामुळे पायाचे स्नायू मोकळे राहण्यास मदत होईल.
- प्रवासात गार पाणी किंवा शीतपेये प्यायल्याने घसा खराब होण्याची शक्यता असते. तसेच बाहेर गेलो असल्याने तेलकट पदार्थही खाण्यात येतात. अशावेळी घसा दुखू नये यासाठी शक्यतो कोमट पाणी पीत राहा. ते शक्य नसल्यास चहा किंवा कॉफी घेतल्यानेही घशाला आराम मिळतो.
- थंडीमुळे सर्दी- खोकला होण्याची शक्यता असल्याने त्यासाठी आवश्यक असणारी घरगुती औषधे, सर्दीसाठी उपयुक्त एखादा बाम, घशासाठी आराम देणाऱ्या गोळ्या घेऊन ठेवा. नवीन ठिकाणी कोणी आजारी पडले आणि लगेच डॉक्टर गाठणे शक्य नसेल तर या औषधांचा उपयोग होतो.
- तुम्ही जात असलेल्या ठिकाणाच्या तापमानाची किमान माहिती करून घ्या आणि त्यानुसार जास्तीचे कपडे सोबत ठेवा. थंडीला पुरतील असे जास्तीचे उबदार कपडे सोबत ठेवा. सोबत वयस्कर व्यक्ती आणि लहान मुले असल्यास शालीसारखे कपडे कोणीही वापरू शकते.



- बर्फाळ प्रदेशात स्नो फॉल पाहण्यासाठी जाणार असाल तर थोडी जास्त काळजी घ्या. बर्फावर जास्त काळ चालू नका. त्यामुळे स्नायू बधीर होऊन त्रास होण्याची शक्यता असते. याशिवाय प्रवास करताना कानावर गार वारे बसणार नाही याची काळजी घ्या. त्यानेही लगेचच सर्दी-खोकला होण्याची शक्यता असते.
- हिवाळ्यात त्वचा कोरडी पडते आणि खाज सुटते. तसेच आगही होते. काहींना खाजवल्यानंतर रक्त येते. त्यामुळे कोल्डक्रिम, तेल, लीपबाम यांसारख्या त्वचेला मऊ ठेवतील अशा गोष्टी सोबत ठेवा. त्याचा निश्चितच फायदा होतो.

# थंडीमुळे त्वचा खूप कोरडी पडल्याने खाज येतेय..?

**हिवाळ्याच्या दिवसांत त्वचेची सगळ्यात जास्त काळजी घ्यावी लागते. उन्हाळ्यात- पावसाळ्यात जेवढं आपण त्वचेकडे लक्ष देत नाही, तेवढं हिवाळ्यात त्वचेला जपावं लागतं. कारण हिवाळ्यातल्या थंड- कोरड्या हवेमुळे अंग लगेचच उलायला लागतं. म्हणजेच त्वचेतलं नैसर्गिक मॉईश्चर कमी होतं आणि मग अंग कोरडं पडायला सुरुवात होते. अशा कोरड्या अंगावर काही जणांना खूपच खाज येते. खास करून पाठ, पाय या भागांत खूपच जास्त खाज येते. अंग खाजवलं की ते आणखीनच ड्राय होतं. म्हणूनच हा त्रास कमी करण्यासाठी काही पुढील काही सोपे उपाय करून बघा...**

## काय कराल?

- खोबरेल तेलाने मसाज : खोबरेल तेल हे त्वचेसाठी एक उत्तम मॉईश्चरायझर आहे. त्यामुळे हिवाळ्याच्या दिवसांत आठवड्यातून एकदा खोबरेल तेलाने संपूर्ण अंगाला मसाज करा. मसाज करण्यासाठी तेल कोमट करून घ्या. मसाज झाल्यानंतर साधारण अर्धा ते पाऊण तासाने आंघोळ करा. म्हणजे तेल अंगात मुरेल. तसेच रोज सकाळी आंघोळ झाल्यानंतर पाठीला, पोटाला खोबरेल तेल लावून घ्या. यामुळे दिवसभर अंग मऊ राहण्यास मदत होईल. रोज रात्री झोपण्यापूर्वीही सगळ्या अंगाला खोबरेल तेल किंवा इतर मॉईश्चरायझर लावण्यास विसरू नका.
- दुधाचा वापर : दुधामध्ये त्वचेला मॉईश्चराईज करणारे अनेक घटक असतात. त्यामुळे दूध हे देखील एक नॅचरल मॉईश्चरायझर म्हणून ओळखलं जातं. आंघोळीपूर्वी संपूर्ण अंगाला दुधाने ८ ते १० मिनिटे मसाज करा. त्यानंतर आंघोळ करा. आंघोळीसाठी साबण वापरणं टाळा. त्याऐवजी बेसनपीठ आणि दही असं मिश्रण वापरा. यामुळेही अंग मऊ होऊन खाज कमी होण्यास मदत होते.
- कडक पाण्याने आंघोळ टाळा : हिवाळ्यात थंडी घालविण्यासाठी अनेक जण आंघोळीसाठी खूप कडक पाणी घेतात. खूप कडक पाणी घेतल्याने त्वचेचं डिहायड्रेशन होतं आणि तिच्यातलं नैसर्गिक मॉईश्चर आणखीनच कमी होतं. त्यामुळे कोमट पाण्यानेच आंघोळ करा.
- सरसूचं तेल : हिवाळ्यात खाज येण्याचं मुख्य कारण त्वचा कोरडी होणे हे आहे. हा त्वचेचा कोरडेपणा दूर करण्यासाठी सरसूचं तेल चांगला पर्याय आहे. फार पूर्वीपासून आपले पूर्वज आंघोळ करण्याआधी शरीराला सरसूचं तेल लावत असत. याने त्वचा मुलायम होत असे. सरसूचे तेल त्वचेच्या आत गेल्यावर त्याने त्वचेला पोषण मिळतं आणि त्वचा मुलायम होते. खाजवणे दूर करण्यासाठी हा चांगला पर्याय आहे.
- कडूलिंब : कडूलिंबाला त्वचेसाठी गोड मानलं जातं. कडूलिंब हा त्वचेसाठी फार फायदेशीर असतो. कारण या झाडाच्या पानांमध्ये अँटीसेप्टिक आणि अँटीबायोटिक गुण असतात. जे खाज दूर करण्यासाठी फायदेशीर असतात. यासाठी कडूलिंबाची पाने पाण्यात उकळून घ्या आणि हे पाणी कोमट झाल्यावर त्याने आंघोळ करा. ही पाने बारीक करून दह्यासोबत खाज येणाऱ्या जागेवर लावून ठेवा. यानेही खाज दूर होते.
- लिंबू : खाज दूर करण्यासाठी सर्वाच चांगला घरगुती उपाय म्हणजे लिंबू. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे लिंबू घरात सहज मिळतं. लिंबामध्ये ॲसिडिक आणि सिट्रिक ॲसिड असतं. याने खाजवण्याची समस्या दूर करण्यास मदत मिळते. हा उपाय गेल्या अनेक वर्षांपासून वापरला जातो. हा उपाय करण्यासाठी लिंबाचा रस पाण्यात टाका आणि खाज येणाऱ्या जागेवर लावा. याने थोडं जळजळ होईल. तसेच दोन चमचे तुळशीच्या पानांचा रस आणि दोन चमचे लिंबाचा रस मिश्रित करुन खाज येत असलेल्या जागेवर लावा. याने खाज दूर होईल.

# हिवाळ्यातील बाइक रायडिंग टिप्स...

**सध्या थंडी वाढली आहे. राज्यातील अनेक शहरे आणि खेड्यांमध्ये तापमानाचा पारा १८ अंशांच्या खाली गेला आहे. पहाटे सर्वत्र धुकं पसरल्याचं पाहायला मिळत आहे. अशातच बाइकने ऑफिसला जाणाऱ्या लोकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा प्रकारचं हवामान असल्यास अपघाताच्या घटना वाढू लागतात. त्यामुळेच आज आम्ही तुम्हाला ४ अशा टिप्स देणार आहोत, ज्या तुम्ही फॉलो केल्या तर तुम्ही स्वतःचं थंडीपासून रक्षण करू शकाल आणि सुरक्षित प्रवास देखील करू शकाल. चला तर मग जाणून घेऊया हिवाळ्यातल्या बाइक रायडिंग टिप्स...**



## अशा प्रकारचे कपडे वापरा

सर्वात पहिली स्टेप म्हणजे प्रवासासाठी योग्य कपड्यांची निवड करणे. बाइकवरून प्रवास करताना खूप जास्त थंडी लागते. यामुळे बाइकवरून कुठेही जाण्यापूर्वी तीन ते चार लेअर्ससह उबदार कपडे घाला. तुम्ही आत इनर घालू शकता. त्यावर शर्ट आणि त्यावर लेदर जॅकेट किंवा स्वेटरचा वापर करू शकता. तुमच्याकडे लेदर जॅकेट असेल तर सर्वोत्तम. पायात चांगले मोजे (सॉक्स) आणि त्यावर बूट घाला. हातात ग्लोव्हज असायला हवेत. बाइक रायडर्ससाठी विशेष ग्लोव्हज मिळतात, ते तुम्ही वापरायला हवेत. कान आणि चेहऱ्यासाठी एक मफलर किंवा फेस मास्क आणि त्यावर हेल्मेट असायला हवं.

## ABS मोडचा वापर करा

अलिकडेच बाइक्समध्ये वेगवेगळ्या रायडिंग कंडिशननुसार एबीएस मोड मिळतात. जसे की, नॉर्मल, रेन आणि स्नो इत्यादी. थंडीत बऱ्याचदा रस्ते ओले होतात, दव पडल्याने रस्ते ओले झाल्याने बाइक घसरण्याची भीती असते. अशा स्थितीत तुम्ही बाइक चालवताना Rain किंवा Snow मोडचा वापर करू शकता. जेणेकरून तुम्ही सुरक्षित प्रवास करू शकाल. तुमच्या बाइकमध्ये असे मोड नसेल तर तुम्ही ओल्या रस्त्यांवरून राईड करताना बाइकचा वेग कमी ठेवा, जेणेकरून बाइक तुमच्या नियंत्रणात राहील.

## लो बीमचा वापर करा



थंडीत बाइकने प्रवास करताना बाइक हाय बीमवर चालवू नका. असं केल्यास रस्त्यावरील व्हिजिबिलिटी खूप कमी होते. यामुळे तुम्हाला बाइक चालवताना अडचणी येतील. तसेच रस्ता वळणावळणांचा असेल तर बाइक चालवणं अधिकच अवघड होऊ शकतं. तसेच समोरून येणारे इतर वाहनचालकदेखील गोंधळतील. त्यामुळे थंडीत बाइक चालवताना नेहमी लो बीमचा वापर करा आणि तुमचा प्रवास सुरक्षित बनवा.

## रिफलेक्टिव्ह टेप

थंडीत सर्वात मोठी समस्या असते ती म्हणजे दूरचं वाहन न दिसणं. यामुळेच अपघात होण्याचं प्रमाण वाढतं. धुक्यामुळे हा धोका अधिक वाढतो. यावर तुम्ही तुमच्या बाइकला रिफ्लेक्टिव्ह टेप लावणं उत्तम ठरू शकतं. तसेच अंधारात हे रिफ्लेक्टिव्ह टेप आपल्या खूप कामी येतात. हल्ली बाजारात अनेक जॅकेट्स देखील मिळतात जे अंधारात चमकतात. तसेच हेल्मेटवर लावता येतील असे स्टिकर्स देखील मिळतात. तुम्ही बाइक राईड करताना याचा वापर करू शकता.



# ताणाने येणारं पुरळ कसं दिसतं?

**अचानक अंगाला खाज सुटू लागणे, अगदी वाळवंटासारखी त्वचा कोरडी होणे, टोचणारे पुरळ अंगावर उठणे, त्वचा लाल होऊन जळजळ जाणवणे असा सगळा त्रास होत असेल तर आपला पहिला अंदाज असतो की घाम-धुळीमुळे होत असेल. मग आपण छान थंडगार पाण्याने आंघोळ करून येता पण तरीही हवं तितकं स्वच्छ वाटतच नाही व त्वचेची खाज सुद्धा कमी होत नाही. स्वच्छतेची काळजी घेऊन त्वचेचे त्रास टाळता येत नसतील तर त्यामागे फक्त अस्वच्छता हेच कारण नाही हे आपण समजून घ्यायला हवे. मंडळी, तणाव हा जीवनाचा एक भाग आहे आणि आपले शरीर त्यावर विविध प्रकारे प्रतिक्रिया देत असते. काही लोकांसाठी, तणावाचा प्रभाव हृदयाची धडधड वाढणे, झोप न लागणे, केसगळती किंवा केस पांढरे होणे अशा रूपात दिसून येतो. काहींसाठी हा प्रभाव त्वचेवर सुद्धा दिसून येतो. त्यामुळे अंगावर उठणाऱ्या पित्ताच्या गाठी, खाज सुटणे, अस्वस्थ वाटणे या साऱ्यामागे तुमच्या मेंदू व मनावरील ताण- तणाव हे कारण असू शकते.**

- आपल्याला तणावामुळे पुरळ का येतं? : तणावामुळे शरीरातील कॉर्टिसॉल आणि अॅड्रेनालाईनसह विविध रसायने आणि हार्मोन्स सक्रिय होतात व शरीरातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. या शारीरिक प्रतिक्रियांमुळे रोगप्रतिकारक शक्ती आणि इतर शारीरिक कार्यांवर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे काहीवेळा पुरळ किंवा अंगावर पित्ताच्या गाठी उठणे यासारख्या प्रतिक्रिया होऊ शकतात. शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम होत असल्याने शरीर आजारी पडू नये म्हणून शरीरच अशा प्रकारे रसायने सक्रिय करत असते. पण हा सुरक्षा उपाय त्वचेवर पुरळ रूपात परिणाम करू शकतो. काही लोकांना अर्टिकेरिया नावाच्या स्वयंप्रतिकार स्थितीमुळे अंगावर पित्ताच्या गाठी येण्याचा त्रास जाणवू शकतो. हा त्रास ६ आठवड्यांपर्यंत टिकतो व काहीवेळा होणारा त्रास वाढूही शकतो.
- तणावामुळे येणारा पुरळ कसा दिसतो? : तणावामुळे येणारा पुरळ व्यक्तीपरत्वे भिन्न दिसू शकतो. परंतु सामान्यतः त्वचा लाल होऊन खाज सुटणे आणि कधीकधी वेदनादायक फोड येणे असेही त्रास जाणवू शकतात. याचे प्रमाण व वेदनांची तीव्रता सुद्धा कमी-जास्त होऊ शकते. काही वेळा अचानक त्रास कमीही होतो तर काही वेळा प्रचंड वाढूही शकतो. पुरळ अनेकदा खाजत असते आणि शरीराच्या वेगवेगळ्या भागात पसरते.

रामबाण ईलाज
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
सेवा क्लिनीक
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## शहीदी समागम कार्यक्रम जागतिक स्तरावर नेण्यासाठी समन्वयाने काम करा -राज्यमंत्री माधुरी मिसाळ

### 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाची आढावा बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)-** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचा कार्यक्रम नांदेडपुरता मर्यादित न राहता जागतिक स्तरावर पोहोचावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने, काटेकोर नियोजनासह जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.



नांदेड येथे होणाऱ्या या शताब्दी वर्ष कार्यक्रमाच्या आयोजनाचा राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दूरदृष्य प्रणालीद्वारे (व्हीडीओ कॉन्फरन्स) सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, राज्यस्तरीय समितीचे समन्वयक रामेश्वर नाईक, समिती अध्यक्ष डॉ. विजय सतबीर सिंग, विभागीय माहिती उपसंचालक, जिल्हा माहिती अधिकारी तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, कार्यक्रमस्थळी पुरेसे पिण्याचे पाणी, स्वच्छ व पर्याप्त शौचालय व्यवस्था सुनिश्चित करण्यात यावी. कार्यक्रमाची प्रचारप्रसिद्धी व्यापक प्रमाणात करण्यात यावी. स्थानिक स्तरावर होणाऱ्या उपक्रमांमध्ये लोकप्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आवश्यक असून सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया व मुद्रित माध्यमांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती केली जावी, असेही त्यांनी निर्देश दिले.

**कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासन सज्ज -जिल्हाधिकारी कर्डिले**

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे दि. २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी असरजन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५२ एकर मैदानावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण, राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास व अपारंपरिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्यासह अनेक मंत्री, संत-महात्मे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

## ११ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. सुरेश सावंत यांची निवड

**नांदेड (प्रतिनिधी)-** पळसप (ता. जि. धाराशिव) येथील शिक्षण महर्षी वसंतराव काळे प्रतिष्ठान आणि किसान वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ११ व्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत यांची निवड करण्यात आली आहे. वसंतराव काळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी हे संमेलन होत असते. यंदाचे हे एक दिवसीय साहित्य संमेलन सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी पळसप येथे होणार आहे. आमदार विक्रम काळे हे या संमेलनाचे स्वागताध्यक्ष आहेत. संयोजकांच्या वतीने प्रा. डी. बी. जांभरूनकर आणि यशवंत कांबळे यांनी डॉ. सावंत यांना निवडपत्र देऊन त्यांचा सत्कार केला.



यापूर्वी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. भास्कर चंदनशिव, प्रा. दत्ता भगत, उत्तम कांबळे, प्रा. ललिता गादगे, इंद्रजित भालेराव, डॉ. जगदीश कदम, डॉ. वृषाली किन्हाळकर, अंजली धानोरकर, डॉ. आसाराम लोमटे इ. मान्यवरांनी ह्या संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे. या साहित्य संमेलनात परिसंवाद, कथाकथन आणि कविसंमेलनाचे आयोजन करण्यात येते. यात दरवर्षी नवोदित कथाकार आणि कवींना सामावून घेतले जाते.

हे संमेलन मराठवाडा पातळीवरचे असल्यामुळे प्रत्येक जिल्ह्याला प्रतिनिधित्व देण्याचा प्रयत्न या संमेलनाचे स्वागताध्यक्ष विक्रम काळे हे सातत्याने करीत असतात. या साहित्य संमेलनातून नवोदित साहित्यिकांना प्रेरणा मिळावी, असाही उद्देश या साहित्य संमेलनाच्या आयोजनात आहे. यंदा या साहित्य संमेलनाचे आयोजन अतिशय दिमाखदार स्वरूपात करण्यात येणार आहे. या संमेलनात ग्रंथदिंडी आणि रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती स्वागताध्यक्ष विक्रम काळे तसेच संयोजन समितीचे प्राचार्य मधुकर गायकवाड, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे आणि प्रा. अंकुश नाडे यांनी एका पत्राद्वारे दिली आहे.

नियोजित संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सावंत यांची आजवर ५८ पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांना महाराष्ट्र शासनाच्या तीन पुरस्कारांसह अन्य प्रतिष्ठित साहित्यसंस्थांचे ४५ पुरस्कार मिळाले आहेत. नुकताच त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. शिक्षणक्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. नांदेड जिल्हा परिषदेचा नरहर कुरुंदकर पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. पुणे येथील अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या जीवनगौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. अलीकडेच त्यांना कुसुमताई चव्हाण जीवनगौरव पुरस्कार मिळाला आहे. डॉ. सावंत यांचे साहित्य शालेय तसेच विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट झाले आहे.

## शहीदी समागम कार्यक्रमात पंचक्रोशीतील गावांचा सहभाग वाढविण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)-** शिख पंथाचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त नांदेड शहर व पंचक्रोशीतील गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग मिळावा, यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी आज लंगर साहिब गुरुद्वारा येथे भेट देऊन बाबा बलवंदरसिंगजी यांच्याशी चर्चा केली.

यावेळी बाबा बलवंदरसिंग यांनी नांदेड शहरासह पंचक्रोशीतील सर्व नागरिकांना आवाहन केले की, शनिवार २४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ वाजता तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा येथून निघणाऱ्या नगर कीर्तनात नागरिकांनी, महिला, युवक व बालगोपालांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. तसेच प्रत्येक गावातून किमान एक दिंडी भजन मंडळासह नगर कीर्तनात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी धर्म, मानवी हक्क व समाजहितासाठी दिलेल्या बलिदानाचा गौरवशाली इतिहास समाजापर्यंत पोहोचावा, यासाठी जनसहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

## जिल्हा रुग्णालयात बहिरेपणा असलेल्या बालकांना श्रवणयंत्र वाटप

**नांदेड (प्रतिनिधी)** -राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत आयोजित शिबिरात नांदेड जिल्ह्यातील ७३ बालकांची तपासणी करण्यात आली असून, ६० श्रवणयंत्रासाठी पात्र झालेल्या बालकांना मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी जिल्हा रुग्णालय नांदेड येथे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके यांच्या हस्ते श्रवणयंत्र वाटप करण्यात आले आहे. या बालकांना वेळेत श्रवणयंत्र उपलब्ध करून दिल्याने त्या बालकांना ऐकू येण्यास मदत होणार असल्यामुळे पालकांनी समाधान व्यक्त केले आहे.



राज्यात शालेय आरोग्य तपासणी हा कार्यक्रम यशस्वी ठरल्याने व कुपोषणाचा प्रश्न गंभीर असल्यामुळे बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यातील ४५ आरोग्य पथकांद्वारे वर्षातून २ वेळा अंगणवाडीतील व एक वेळा शाळेतील बालकांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. ० ते १८ या वयोगटातील बालकांची 4D म्हणजे जन्मतः व्यंग, पोषणमूल्यांची कमतरता, शारीरिक व मानसिक विकासात्मक विलंब, आजार यांचे निदान व उपचार करण्यात येतात.

याचाच एक उपक्रम म्हणून १६ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा रुग्णालय नांदेड येथे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मेघना कावली यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पांडुरंग पावडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. राजाभाऊ बुट्टे यांच्या नेतृत्त्वाखाली जन्मजात बहिरेपणाचा आजार असलेल्या बालकांचे तपासणीचे शिबीर जिल्हा रुग्णालय नांदेड येथे घेण्यात आले होते.

हृदयरोग तपासणी (२ऊ एउक्ज) ,नेत्र रोग, आकडी/फेफरे यांची मोठ्याप्रमावर शिबिरे आयोजीत करून निदान व औषधोपचार करण्यात येते. जिल्ह्यातील अनेक मुला-मुलीना या कार्यक्रमाचा मोफत लाभ झालेला असून त्यात अनेक जणांवर हृदय शस्त्रक्रिया व इतर शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

## जबरी चोरीचा बनाव करुन खोटी माहिती देणाऱ्या आरोपीस नांदेड ग्रामीण पोलिसांनी केले जेरबंद

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** जबरी चोरीचा बनाव करून खोटी माहिती देणाऱ्या आरोपी पांडुरंग बाबाराव आखरे यास नांदेड ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने अटक केली असून, त्याच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी गुन्हे उघडकीस आणणे बाबत सर्व पो. स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने यातील आरोपी अर्जदार पांडुरंग बाबाराव आखरे यांनी दि. १९ जानेवारी २०२६ रोजी ७.३० वा. सु. पो.स्टे. नांदेड ग्रामीण येथे कळविले की, तीन अनोळखी चोरट्याने त्याच्या गळ्याला चाकू लावून खिशातील ४३ ग्रॅम सोन्याचे गंठण, रेडमी कंपनीचा मोबाईल व मोटारसायकलची चावी जबरीने चोरी करुन पळून गेले आहेत अशी माहिती मिळाल्यावरुन वरील नमूद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी सदर घटनेच्या ठिकाणी भेट दिली. अर्जदारास पो.स्टे.ला गुन्हा दाखल करणे बाबत कळविले असता त्याने अर्ज घेवून चौकशी करणे बाबत विनंती केली.

सदर अर्ज चौकशीत परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज चेक केले. रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक केले. सदर अर्जदार याची वैद्यकीय तपासणी तसेच एस.बी.आय, बँक विष्णुपुरी येथे जावून अर्जदार याचे बँक खात्याबाबत चौकशी केली असता सदर अर्जदार हा पूर्णपणे खोटे सांगत असल्याचे निष्पन्न होत असल्याने अर्जदारास विश्वासात घेवुन अर्ज संबंधाने चौकशी केली असता अर्जदार यांने सांगितले की, त्याने खोटा अर्ज दिला आहे. तसेच जबरी चोरीचा बनाव केला आहे. अर्जदाराने मागील दोन वर्षात अंदाजे १५ लाख रुपये शेअर्स मार्केटमध्ये गमावले आहेत. सन २०२४ मध्ये त्याच्या पत्नीचे सोन्याचे ४३ ग्रॅमचे गंठण एस.बी.आय. बँकेत गहाण ठेवून कर्ज घेतले होते. अर्जदारास पैशाची कमतरता भासत असल्याने त्याने जुलै २०२५ मध्ये त्याच्या पत्नीचे सोन्याचे ४३ ग्रॅम गंठण एसबीआय बँकेतून १,१५,८००/- रुपये भरुन सोडून घेतले व ते विकले होते. याबाबत अर्जदाराने पत्नीस काहीही सांगितले नव्हते.अर्जदाराची पत्नी त्यास वारंवार विचारणा करत असल्यामुळे त्याने जबरी चोरीचा बनाव केला असं अर्जदार आरोपीने कबुली दिली.

सदर अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत असे निष्पन्न झाले की, अर्जदार यांने दिलेला अर्ज/माहिती खोटी असल्याचे माहित असून सुध्दा दुसऱ्याना क्षती/नुकसान/त्रास व्हावा या उद्देशाने जाणिवपूर्वक तक्रारी अर्ज/माहिती दिली असल्याने सदर आरोपी विरुध्द पोलीस कॉन्स्टेबल मारोती नौकरी पंचलिग यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पो.स्टे.नांदड ग्रामीण येथे कलम २१७,११८,१, भारतीय न्याय संहिता २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कलंबर येथे विहिरीत पडून शेतकऱ्याचा मृत्यू तर हुंडा गावात शेतकरी आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)-** सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून एका शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केली. तर दुसऱ्या घटनेत शेताला पाणी देत असताना विहिरीत पडल्याने शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना लोहा तालुक्यातील कलंबर येथे घडली.

उमरी तालुक्यातील हुंडा येथे राहणारा शेतकरी नागोराव बाबुराव चोपडे (वय ४५) यांच्या शेतात मागील अनेक वर्षांपासून सततची नापिकी होत होती. या नापिकीला व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकरी नागोराव चोपडे यांनी आपल्या राहत्या घरी १९ जानेवारी रोजी सकाळी आठच्या सुमारास विष प्राशन केले आणि यातच त्यांचा मृत्यू झाला. श्रीनिवास चोपडे यांच्या माहितीवरून उमरी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक सूर्यवंशी करत आहेत. तर दुसऱ्या घटनेत शेतातील पिकाला पाणी देण्यासाठी ते आपल्या विहिरीवर गेले होते. यावेळी त्यांचा तोल गेल्याने विहिरीतील पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला. ही घटना १७ ते १८ जानेवारीच्या दरम्यान कलंबर शिवारात घडली. गणेश मैलारे यांच्या माहितीवरून उस्माननगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## प्रभाग २० मधील सौ. निरंजना लांडगे सर्वाधिक मते घेऊन तर सौ. दीपाली मोरे यांची विजयाची हॅट्रिक

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)-** मनपा निवडणुकीत भाजपने स्वबळावर निवडणूक लढवून प्रभाग क्रमांक १९ व २० मधील नऊही उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी झाले असून, यात मनपा क्षेत्रात सर्वाधिक मते घेऊन सौ. निरंजना राजू लांडगे एकूण ११२७० मते घेऊन विजयी होण्याचा मान मिळवला आहे. तर तीन वेळेस सतत निवडून येण्याचा बहुमान सौ. दीपाली संतोष मोरे यांना मिळाला असून, त्यांना ५२६७ मतांची आघाडी मिळाली आहे.





माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली भाजपने स्वबळावर निवडणूक लढविली, यात प्रभाग क्रमांक १९ व २० मध्ये भाजपाचे उमेदवार अनुक्रमे प्रचंड मताधिक्याने विजयी झाले असून यात सौ. निरंजना राजू लांडगे यांनी ८००१ मतांची आघाडी घेऊन तर सतत तीन वेळेस हॅट्रीक विजयी होण्याचा मान वसरणी कौठा प्रभागातील सौ. दीपाली संतोष मोरे ५२६७ तर प्रभाग क्रमांक २० मधील सर्वसाधारण पुरुष गटातून संजय घोगरे पाटील ६१२२, महिला सर्वसाधारण गटातून प्रथमच निवडणूक लढविलेल्या सौ. सुवर्णा सतीश पाटील बस्वदे ७८३८,वैजनाथ ईश्वरराव देशमुख ६२८८,विघमान नगरसेविका मंगला गजानन देशमुख ६७९०,व मनपा क्षेत्रातील सर्वाधिक मते घेऊन येण्याचा बहुमान सौ. निरजंना राजु लांडगे ८००१मताची निर्णायक आघाडी मिळाली आहे.

प्रभाग क्रमांक १९ मधील सतत तीन वेळेस निवडून येण्याचा मान बहुमान विधमान नगरसेविका सौ.दिपाली संतोष मोरे यांना मिळाला असुन त्यांनी ५२६७ मतांची आघाडी घेऊन विजय मिळवला तर माजी नगरसेवक अभिषेक सौदे हे ४००९, तर सुलोचना धोंडीबा काकडे ३८८३, विघमान नगरसेवक राजू पाटील काळे यांच्या पत्नी सौ. अनुराधा राजू पाटील काळे ४३९२ मते घेऊन त्या प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्या आहेत.

## दुर्गादासराव तुळजापूरकर यांचे निधन

**भोकर (प्रतिनिधी)-** संभाजीनगर टिळक कॉलनीतील रहिवासी (सद्य स्थित हैदराबाद,) दुर्गादासराव तुळजापूरकर (७३) यांचे दि. २० जानेवारी रोजी रात्री १२:५५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. हैदराबाद येथील खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.



त्यांच्या पार्थिवावर हैदराबाद येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मंगेश तुळजापूर यांचे ते वडील होत. भोकर येथील पत्रकार श्रीकांत देव यांचे ते सासरे होत.

## सौ. निर्मलाबाई सोनटक्के यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)-** तालुक्यातील लोणी (बु) येथील महिला नागरीक निर्मलाबाई बालाजीराव सोनटक्के (वय ६० वर्षे) यांचे दीर्घ आजाराने मंगळवार, दि. २० जानेवारी रोजी सकाळी निधन झाले असून, त्यांच्या पार्थिवावर बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी स. १० वा. लोणी ता. अर्धापूर येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. निर्मलाबाई सोनटक्के यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी, सुना, नातू, पणतू असा परीवार आहे. त्या साहेबराव सोनटक्के, शिवराज सोनटक्के यांच्या आई होत.

## पद्मीनबाई तुमवाड यांचे निधन



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)-** नायगाव तालुक्यातील सुजलेगाव येथील सेवानिवृत्त अंगणवाडी शिक्षिका, मायेचा पदर पसरवणाऱ्या आणि कर्तव्यनिष्ठ सेवेसाठी ओळखल्या जाणाऱ्या पद्मिनबाई दिगंबर तुमवाड यांचे दीर्घ आजाराने दि. १९ रोजी रात्री ११.५० वाजता निधन झाले.

प्रसिद्ध शाहीर दिगु तुमवाड यांच्या त्या सहचारिणी होत. आयुष्यभर समाज, कुटुंब आणि मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी निःस्वार्थपणे आपले जीवन समर्पित केले. सोमवार, दि. २० रोजी सुजलेगाव येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, पाच मुली, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे. त्या विचारवंत दत्ता तुमवाड यांच्या वहिनी होत.

## नांदेडमध्ये ठाकरे शिवसेनेने मनपा निवडणुकीत दम सोडला; एकेकाळी बालेकिल्ला असलेला बुरुज ढासळला

**नांदेड (प्रतिनिधी)-** शिवसेनेचा मराठवाड्यातील एकमेव बालेकिल्ला म्हणून नांदेड जिल्ह्याचा नेहमी उल्लेख होत गेला. परंतु मागील काही काळापासून नांदेडच्या शिवसेनेला घरघर लागली. स्थानिक पदाधिकारी आणि वरिष्ठ पातळीवरील नेते यांच्यात समन्वयाचा अभाव नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीतून दिसून आला. कसेबसे ३५ उमेदवार महापालिका निवडणुकीत स्थानिक नेतृत्वाने उभे केले, परंतु या पक्षाकडे कुठलीही प्रचार यंत्रणा किंवा मनुष्यबळ नसल्याने एकही उमेदवार त्यांना महापालिकेत पाठवता आला नाही. या निवडणुकीत शिवसेनेने खऱ्या अर्थाने दम सोडला. शिवसेनेला उर्जित अवस्था आणायची असेल तर या जिल्ह्याला पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून ताकद देणे गरजेचे आहे.

मराठवाड्यात शिवसेनेचे मुहूर्तमेढ रोवल्यानंतर तत्कालीन संपर्कप्रमुख दिवाकर रावते यांनी या भागात शिवसेना वाढवली. घराघरात, मनामनात शिवसेना पोहोचवली. त्याच शिवसेनेने नांदेड जिल्ह्यात एकेकाळी चार- चार आमदार निवडून दिले. मात्र नंतरच्या काळात शिवसेनेच्या हाती फारसे यश आले नाही. नांदेड शहरात शिवसेनेचे आंदोलन म्हंटले की विरोधकांची धांदल उडायची. मात्र आज ठाकरे शिवसेनेला गळती लागली. तीन वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी बंड करत आपल्या असंख्य सहकाऱ्यांना सोबत घेऊन शिवसेना फोडली. त्या बंडात नांदेडमधील शिवसेनेचे आमदार होते. आज ते सत्तेत आहेत, परंतु ठाकरे सेना सत्तेच्या बाहेर पडली. यातच नगरपंचायत, महानगरपालिका निवडणुका संपन्न झाल्या. या निवडणुकांमध्ये ठाकरे शिवसेनेला फारसे यश आले नाही. विशेष म्हणजे मुंबई महापालिका त्यांच्या हातातून गेली. नांदेडमध्ये तर एकही उमेदवार शिवसेनेला निवडून आणता आला नाही. येथील स्थानिक पातळीवरील नेत्यांनी कसेबसे ३५ उमेदवार म्हणजेच ज्यांनी उमेदवारी मागितली त्यांना तिकीट देऊन उभे केले. परंतु त्यांच्या पाठीमागे सक्षमपणे कार्यकर्ते उभे न राहिल्याने काही निवडून येणारे उमेदवार धनशक्ती पुढे पराजित झाले. शिवसेनेचा आवाज नांदेडपुरता तरी बंद झाल्याचे दिसत आहे.

येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका तोंडावर आहेत. या दोन्ही निवडणुकांमध्ये ठाकरे शिवसेनेची महापालिका निवडणुकीप्रमाणेच अवस्था राहणार की, ठाकरे गट आपली ताकद दाखविणार याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे. निष्ठावंत कार्यकर्ते शिवसेनेत सध्यातरी पहावयास मिळत नाहीत. शिवसेना आणि मनसे एकत्र आल्यामुळे शिवसेनेला उर्जित अवस्था निर्माण होईल असा आशावाद कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत. नांदेडसारख्या बालेकिल्ल्यात शिवसेना निद्रा अवस्थेत गेल्याचे नुकत्याच महापालिका निवडणुकीच्या निकालातून दिसून येते. त्यांच्या अनेक उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले. शिवसेनेच्या वाघाची डरकाळी आता सध्या तरी दूरदुरपर्यंत ऐकाव्यास मिळणे दुरापास्त झाले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४
ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com